महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**फाईल क्र. १४४२/गट-क संयुक्त-क.स./२०१९/तेरा-ब** **दिनांक:- १७ सप्टेंबर, २०२१**

# -:प्रसिद्धीपत्रक:-

# सुधारित अंतिम निकाल

**विषय - महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९**

**संदर्भ - कर सहायक (मुख्य) परीक्षा-२०१९ (जाहिरात क्र. १६/२०१९)**

महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०१९ मधील “कर सहायक (मुख्य) परीक्षा-२०१९ (जाहिरात क्र.१६/२०१९) या पदाचा सुधारित निकाल जाहीर करण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत सुधारित निकाल हा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रर्वगाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक ३१ मे, २०२१ तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी-२०२१/प्र.क्र.३६०/१६-ब, दिनांक १५ जुलै, २०२१ मधील क्रमांक २ च्या तरतुदीनुसार करण्यात आलेला आहे.

**३.** अराखीव वर्गवारीमध्ये रुपांतरण करतांना सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील ज्या उमेदवाराने अराखीव प्रवर्गा करीता विहित करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांच्याकरिता जाहिरातीतील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना देय असलेली वयोमर्यादा व परीक्षा शुल्काची सवलत शासन निर्णय दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये कायम ठेवण्यात आली आहे.

**४.** SEBC (सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग) प्रवर्गातील ज्या महिला उमेदवारांनी अराखीव (खुला) असा विकल्प दिला आहे, त्यांनी ज्याप्रमाणे अर्जात NCL-No / Yes दावे केलेले आहेत, त्याप्रमाणे त्यांचे दावे ग्राहय धरण्यात आले आहेत.

**५.** अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.१ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दि.१८ ऑगस्ट, २०१६ व दि. ११ मार्च, २०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदीनुसार आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-क पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांकास (६ मे, २०१९) किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील. तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

६....

**६.** दिव्यांगाकरिता राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकीय मंडळाकडून तपासून घेण्याच्या अधीन राहून त्यांची शिफारस करण्यात येत आहे.दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आयोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्रक्र.४६/आरोग्य-६, दि.१४/९/२०१८ मधील आदेशानुसार SADM या संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**७.** प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे उमेदवारांच्या शिफारशी त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता नियुक्तीपूर्वी शासन स्तरावरुन मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत.

सदर तपासणीत उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतुदीनुसार दावे तपासताना किंवा अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी / शिफारस कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**८.** प्रस्तुत गुणवत्ता यादीमधील उमेदवारांची गुणवत्ता व पात्रता उमेदवारांनी अर्जात केलेले दावे विचारात घेऊन निश्चित करण्यात आली आहे. शिफारसपात्र उमेदवार वगळता अन्य उमेदवारांची गुणवत्ता व पात्रता अर्जातील दाव्यांच्या आधारे तपासण्याच्या अधीन राहून सदर गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे.

**९.** प्रस्तुत निकाल समांतर आरक्षण संदर्भातील दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकातील तरतुदी विचारात घेऊन प्रसिध्द करण्यात येत आहे.

**१०.** प्रस्तुत सुधारित अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत आयोगाकडे Online पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना क्रमांक ६.४.४ पहावी.)

**११.** उमेदवारांच्या माहितीसाठी संपूर्ण गुणवत्ता यादी, शिफारस यादी व वर्गवारीनिहाय शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut off Marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

**१२.** सदर परीक्षेमध्ये **श्री. मोहम्मद शाहिद मोहम्मद अय्युब (बैठक क्र. NG001258)** हे राज्यात प्रथम आले आहेत. मागासवर्गवारीतून **श्री. पाटील मोहन अशोक (बैठक क्र. PN002326)** तसेच महिलांमध्ये **श्रीमती निकम देवयानी दौलतराव (बैठक क्र. PN001335)** ह्या प्रथम आल्या आहेत.

**ठिकाण : मुंबई**

**उपसचिव (परीक्षा-२)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**